# मुख्य अग्निशमन अधिकारी यांचे कार्यालय

पुणे महानगरपालिका, पुणे

मध्यवर्ती अग्निशमन केंद्र, महात्मा फुले पेठ, पुणे-४११०४२.

ई-मेल-pmcfireoffice@punecorporation.org,दूरध्वनीक्र.०२०२६४५१७०७


जा.क्र.अशाद/ 9399 (एमडीडब्ल्यू/००२८/१९) दिनांक - ३०/०६/२०२६

प्रती,

वास्तुविशारदाचे नाव :– एम. बी. चौधरी ,

भांडारकर रोड, पुणे

विषय :- प्लॉट-ए, स.नं.८१/२७, सीटीएस नं.१३४०,मुंढवा, पुणे येथील व्यापारी इमारतीकरिता अंतिम ना-हरकत दाखला मिळणे बाबत.

(इमारत उंची – ६४.६५ मी. आणि इमारतीचे एकूण (Builtup) क्षेत्रफळ –२०८६०.८१ चौ.मी.)

संदर्भ :-१) आपलेकडील अर्ज इकडील आ. क्र.३४०४, दि.१२/०६/२०२६.

२) सुधारित प्राथमिक ना हरकत दाखला क्र.एफबी/४३८७,दि.१२/०१/२०२३.

३) अंशतः अंतिम ना हरकत दाखला क्र.अशाद/२७१,दि.२२/०४/२०२५. (उंची-७.६५ मीटर)

४) अंशतः अंतिम ना हरकत दाखला क्र.अशाद/१६१२,दि.१६/०७/२०२५. (उंची-१४.६५ मीटर)

५) अंशतः अंतिम ना हरकत दाखला क्र.अशाद/३६४८,दि.२७/११/२०२५.(उंची-५७.४५ मीटर)

६) बांधकाम विकास विभाग,पुणे मनपा क्र.सीसी/३२६५/२५, दि.२४/११/२०२५.

महोदय

आपले विनंतीनुसार, या अग्निशमन विभागाच्या प्रतिनिधीने दि.२२/०६/२०२६ रोजी श्री. तुषार कदम यांच्यासह प्रस्तावित जागेला भेट दिली आणि सुधारित प्राथमिक अग्निशमन ना हरकत दाखल्यामध्ये सुचविलेल्या उपकरणे आणि पोर्टेबल अग्निशामक उपकरणांसह हायड्रंट प्रणाली, होज रील प्रणाली इत्यादीची चाचणी केली. सुधारित प्राथमिक ना हरकत दाखला क्र. एफबी/४३८७,दि.१२/०१/२०२३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे महाराष्ट्र आग प्रतिबंधक आणि जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ नुसार आग प्रतिबंधक उपाययोजना केल्याचे व सुस्थितीत असलेबाबतचे मे. स्टार फायर सिस्टिम्स प्रा. लि., पुणे यांनी प्रमाणपत्र 'अ' आणि प्रमाणपत्र 'ब' सादर केलेले आहे. सदर इमारतीसाठी वार्षिक फी पोटी चलन क्र.१६९२८, दि.१७/०६/२०२६ अन्वये रक्कम रु.१,०४,९००/- पुणे म.न.पा.कोषागारात भरण्यात आलेले आहे.

अग्निशमन यंत्रणेच्या दुरुस्तीची कामे ही परवानाधारक कंत्राटदारा कडूनच करून घेण्यात यावी. त्यांची यादी www.mahafireservice.gov.in या वेबसाईट वर उपलब्ध आहे.

तरी वरील बाबींचा विचार करता, सदर ठिकाणी करण्यात आलेल्या आग प्रतिबंधक उपाययोजना कायम सुस्थितीत व कार्यान्वित ठेवण्याचे, दरवर्षी लायसन्स प्राप्त अभिकरणाकडून सदरील यंत्रणा तपासणी करून त्याप्रमाणे फॉर्म 'ब' सादर करण्याच्या अटींस अधीन राहून, विषयांकित ठिकाणचे इमारतीच्या वापरासाठी या विभागाचा अग्निसुरक्षेच्या दृष्टीने अंतिम ना हरकत दाखला देण्यात येत आहे.

इमारतीच्या देखभालीची जबाबदारी असलेल्या व्यक्तीचे, मालकाचे नाव या कार्यालयाला कळवावे. इमारतीमध्ये दिलेली अग्निसुरक्षा यंत्रणा कोणत्याही कारणास्तव इमारतीतून काढू नये.

तपासणी व निरीक्षण

30/6/26

(समीर बं. शेख)

स्टेशन ड्युटी ऑफिसर

पुणे महानगरपालिका

३०/६/२६

३०/६/२६

(देवेंद्र पोटफोडे)

मुख्य अग्निशमन अधिकारी

पुणे महानगरपालिका

प्रत:- अधीक्षक अभियंता, बांधकाम विकास विभाग, पुणे मनपा.